जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2021
पुढारी

संक्षिप्त

# विद्यापीठात २२ रोजी राष्ट्रीय वेबिनार

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठ डॉ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग यांच्या ५८ व्या वर्धापनदिनानिमित्त २२ जुलै रोजी राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. पंजाब विद्यापीठाचे उपग्रंथपाल डॉ. नीरजकुमार सिंग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूरच्या डॉ. शालिनी लिहितकर मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. याप्रसंगी ग्रंथापाल यांच्या निर्देशिकेचे प्रकाशन केले जाणार आहे. कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यशाळा निमंत्रक डॉ. नमिता खोत यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2021
पुढारी

# विद्यार्थ्यांनी बौद्धिक क्षमता वाढवावी : दुबे

## 'कॅम्पस टू कार्पोरेट कनेक्ट' उपक्रमाचे शिवाजी विद्यापीठात उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांना नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत; मात्र यासाठी प्रत्येकाने बौद्धिक क्षमता वृद्धिंगत केली पाहिजे, असा सल्ला बंगळूर येथील 'स्मार्ट सोल्युशन'चे संचालक नवीन कुमार दुबे यांनी दिला.

शिवाजी विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलच्या वतीने आयोजित 'कॅम्पस टू कार्पोरेट कनेक्ट' उपक्रमात ते 'बुद्धिमत्ता चाचणी' विषयावर बोलत होते. उपक्रमाचा रविवारी ऑनलाईन प्रारंभ झाला. अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. डॉ. महादेव देशमुख होते. यावेळी दुबे म्हणाले, विद्यार्थ्यांनी बौद्धिक जाणिवा विकसित करण्यावर भर देणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारच्या समस्येचे निराकरण कसे होईल, याकडे कटाक्षाने पाहावे. कामात व निर्णय प्रक्रियेत अचुकता महत्त्वाची आहे. स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी इंग्रजी भाषा अवगत असणे अत्यावश्यक आहे. इंग्रजीमध्ये विचार करायला शिकले पाहिजे. इंग्रजी ऐकणे, बोलणे, लिहिण्याबरोबरच इंग्रजीत विचार करण्याने ही भाषा लवकर अवगत होईल, असे ते म्हणाले.



अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रा. डॉ. देशमुख म्हणाले, शिवाजी विद्यापीठ सातत्याने विद्यार्थ्यांमध्ये विविध प्रकारची कौशल्ये विकसित होण्यासाठी अनेक उपक्रम राबविते. 'कॅम्पस टू कार्पोरेट कनेक्ट' या उपक्रमातूनही विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये वाढीस मदत होणार आहे. स्पर्धेत टिकण्यासाठी ही कौशल्ये विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील. उपक्रमाचे समन्वयक डॉ. नितीन माळी यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठाचे प्लेसमेंट अधिकारी डॉ. जी. एस. राशीनकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2021
सकाळ

# शिस्त, संयमातून सम्यक संपत्ती निर्माण करता येते

## सुहास रजपूत; वाणिज्य विभागातर्फे वेबिनार

**उजळाईवाडी, ता. १८** : "परतावा आणि जोखीम तपासण्याबरोबरच शिस्त, संयमातून सम्यक संपत्ती निर्माण करता येते. दीर्घ पल्ल्याच्या परताव्यासाठीची गुंतवणूक महत्त्वाची असून, त्यासाठी व्यवस्थित नियोजन करण्याची गरज आहे," असे मत प्रोफिसियंत माईंड संस्थेचे सुहास रजपूत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे आयोजित 'पैशाचे व्यवस्थापन' यावर वेबिनार झाले. विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते.

"शेअर बाजाराविषयी ज्ञान जागरुकता ही त्याबाबतची कौशल्ये विकसित करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. पैशाचे व्यवस्थापन हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे," असे मत डॉ. महाजन यांनी व्यक्त केले. बॉम्बे स्टॉक एस्क्चेंजच्या गुंतवणूक जागरुकता कार्यक्रमांतर्गत वेबिनारचे आयोजन केले. वॉरेन बफेट, चार्ली मंगर, स्टीफन कोवे, बेन्जामिन फ्रॅन्कलीन यांचे गुंतवणुकीबाबतचे तंत्र आणि विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी स्वागत केले. डॉ. दीपा इंगवले यांनी आभार मानले. डॉ. एच. एम. ठाकर, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. अनुप मुळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2021
सकाळ

# राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन

**उजळाईवाडी, ता. १८ :** बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागातर्फे ५८ व्या वर्धापन दिनानिमित्त गुरुवारी (ता. २२) 'मॉडर्न ट्रेंडस् इन रिसर्च व्हीजीबिलिटी, मेट्रीज ॲण्ड सेल्फ अर्कायव्हींग फ्लॅटफॉर्म' यावर राष्ट्रीय वेबिनार होणार आहे. पंजाब विद्यापीठाचे उपग्रंथपाल डॉ. नीरजकुमार सिंग 'एनहान्सिंग रिसर्च व्हीजीबिलीटी ॲण्ड इटस् इम्पॅम्ट ऑन सायटींफिक रिसर्च' यावर तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सहयोगी प्रा. डॉ. शालिनी लिहितकर या 'इमर्जिंग रिसर्च प्रोफाईलिंग टुल्स् टू बूस्ट रिसर्च व्हीजीबिलिटी' यावर मार्गदर्शन करतील.



राष्ट्रीय वेबिनारचे उद्घाटक तथा अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. शिवाजी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथपाल यांची निर्देशिकाचे ऑनलाईन उद्घाटन तथा प्रकाशन होईल. राष्ट्रीय वेबिनारसाठी कोणत्याही प्रकारचे नोंदणी शुल्क आकारले जाणार नसून, Webex या Platform वरती हा वेबिनार आयोजित केला आहे. विद्यापीठ, महाविद्यालयीन स्तरावरील सर्व शिक्षक, संशोधक, संचालक, नॅक समन्वयक तसेच सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी राष्ट्रीय कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. नमिता खोत यांनी केले.

19 JUL 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी बौद्धिक क्षमता वाढवावी : दुबे

**उजळाईवाडी, ता. १८ :** "विद्यार्थ्यांना नोकरीच्या अनेक संधी आहेत. मात्र, यासाठी प्रत्येकाने आपली बौद्धिक क्षमता वृद्धिंगत केली पाहिजे," असा सल्ला बंगळूर येथील 'स्मार्ट सोल्युशन'चे संचालक नवीनकुमार दुबे यांनी दिला.

शिवाजी विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलतर्फे 'कॅम्पस टू कार्पोरेट कनेक्ट' उपक्रमाचा रविवारी ऑनलाईन प्रारंभ झाला. यावेळी ते 'बुद्धिमत्ता चाचणी' या विषयावर बोलत होते. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. डॉ. महादेव देशमुख अध्यक्षस्थानी होते.

दुबे म्हणाले, "विद्यार्थ्यांनी बौद्धिक जाणीवा विकसित करण्यावर भर द्यावा. कोणत्याही प्रकारच्या समस्येचे निराकरण कसे होईल, याकडे कटाक्षाने पहावे.

कामात आणि निर्णय प्रक्रियेत अचूकता महत्त्वाची आहे. आपण कोणत्या पार्श्वभूमीतून आलात, याला आता फारसा अर्थ नाही. आपल्या क्षमता किती आणि कशा वाढवतो, याला सर्वाधिक महत्व आहे. इंग्रजी भाषा अवगत असणे अत्यावश्यक आहे. आपण इंग्रजीमध्ये विचार करायला शिकले पाहिजे. इंग्रजी ऐकणे, बोलणे, लिहिण्याबरोबरच इंग्रजीत विचार करण्याने ही भाषा आपल्याला लवकर अवगत होईल."

समन्वयक डॉ. नितीन माळी यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठाचे प्लेसमेंट अधिकारी डॉ. जी. एस. राशीनकर यांनी आभार मानले.